**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९

दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/937/२०१९

दिनांक : 14 JUN 2019

अर्वाचा नमुना

प्रति,

मे.-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

विषयः- हरभरा दाळ ..दरपत्रक मागणी

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता खालील नमूद तपशीलाप्रमाणे हरबरा दाळ वितरक/पुरवठाधारक यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने तातडीने खरेदी करावयाची आहे.

| अ.नं. | तपशिल | मागणी |
|---|---|---|
| १. | हरबरा दाळ (चना दाळ)<br>Split gram, Unpolished, Dry<br>Stone less | ३०० क्विंटल<br>(तीनशे ) |

वरील हरबरा दाळ खरेदीसाठी खालीलप्रमाणे अटी-शर्ती लागु राहतील, याचा दरपत्रक भरताना विचार करावा.

अटी/शर्ती –

१. हरबरा दाळीचा पुरवठा हा त्वरित करावा.

२. दरपत्रकासोबत **लिफाफा क्र.१ मध्ये** खालील अ.नं. ४ मध्ये नमुद केलेप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत व **लिफाफा क्र.२ मध्ये स्वत:चे लेटरहेडवर हरबरा दाळीसाठी सर्व कर, जीएसटी, टीडीएस, हमाली, वाराई शिर्डी येथील संस्थानचे भांडार विभागात पोहचचे वाहतूक खर्चासह प्रती क्विंटलचे दर सादर करावेत.** लिफाफा क्र.१ मधील पात्र दरपत्रकधारकांचेच लिफाफा क्र.२ चा विचार करण्यात येईल.

३. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST नंबर पावती, FSSAI/AGMARK परवाना, पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रे सादर करावीत.

४. हरबरा दाळ- १ किलो नमुना म्हणून दरपत्रकासोबत दरपत्रकाचे मुदतीअखेर खरेदी विभागाचे कार्यालयात सादर करावी.

पान नं.२ वर

५. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांचे दरपत्रक मंजुर होतील त्यांना पुरवठा आदेश मंजुर झालेचे कळविलेनंतर विहित मुदतीत हरबरा दाळीचा पुरवठा करावयाची हमी म्हणून पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम DD व्दारे/रोखीने/RTGS व्दारे सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे भरावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरीत्या दाळीचा पुरवठा पुर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत रकमेवर व्याज मिळणार नाही. **तसेच दरपत्रक मंजुर झालेनंतर शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरीत नोटराईज्ड करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल. करारनाम्याची नोटरी फी संबंधित दरपत्रकधारकास आदा करावी लागेल.**

६. हरबरा दाळीचा पुरवठा ज्युट बारदाना ५० किलोचे गोणीत नमुना दिलेल्या दाळीप्रमाणे करावा लागेल. गोणीवर FSSAI कायदयातील तरतुदीनुसार Date of Packing, Weight and Best Before date इत्यादी तपशिल असणे आवश्यक आहे.

७. पुरवठा केलेल्या हरबरा दाळीची क्वांटीटी जास्त असलेमुळे Randomly sample पाहून पुरवविलेली दाळ स्वीकारली जाईल, तथापि दाळीचा वापर करताना काही खराब दाळ आढळून आल्यास ती दाळ बदलून दयावी लागेल.

८. हरबरा दाळीचे दर भरताना संस्थानचे शिर्डी भांडार पोहचचे वाहतूक, हमाली, वाराई, G.S.T., TDS सह सर्व कर व खर्च समावेशक प्रती क्विंटलचे दर द्यावेत. इतर कुठलीही रक्कम स्वतंत्र आदा केली जाणार नाही.

९. हरबरा दाळ पुरविलेनंतर साधारण एक महिन्यामध्ये त्याचे बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी संस्थानकडून आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

१०. फर्मचे लेटरहेडवरील सिलबंद पाकिटातील दरपत्रक शिर्डी येथे वेळेवर पोहचणे आवश्यक आहे. दरपत्रक देताना " हरबरा दाळ पुरविणेचे दरपत्रक" असा पाकिटावर स्पष्ट उल्लेख करावा.

११. उशिरा आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

१२. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१३. शिर्डी संस्थान ही धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

१४. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.

१५. दरपत्रक मागणीची अंतीम दिनांक 20 / 06/२०१९.

(दीपक मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी